सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | १. सौ.दिपमाला मनोज काळे (मा.महापौर)<br>२. श्री.मनोज सुरेश चौधरी (मा.उपमहापौर) | कै.मा.अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे दुखद: निधनाबद्दल. |
| २. | सौ.दिपमाला मनोज काळे (मा.महापौर) | १) जळगांव शहरातील जुने जळगांव परिसरातील रहिवासी कै.हर्षाली अमोल खडके, २) जळगांव शहरातील जुने जळगांव परिसरातील मा.नगराध्यक्ष यांचे चिरंजीव कै.नारायण गिरधर खडके, ३) जळगांव शहरातील जीवनमोती हौसींग सोसायटी परिसरातील रहिवासी कै.सुभाष किसन नेमाडे, ४) जळगांव शहरातील गणेश कॉलनी परिसरातील रहिवासी कै.राहुल पंजाबराव चव्हाण, ५) जळगांव शहरातील यशवंत कॉलनी परिसरातील रहिवासी कै.एन.डी.भोळे सर, ६) जळगांव शहरातील दिनानाथवाडी परिसरातील रहिवासी कै.मधुकर पुनमचंद पाटील, ७) जळगांव शहरातील आशाबाबा नगर परिसरातील रहिवासी कै.उपेंद्र (चिकू) बापु पाटील यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ३. | ॲड. सौ.शुचिता अतुलसिंह हाडा | जळगांव शहर महानगरपालिकेच्या मागील सभागृहाचे अभ्यासू सदस्य माजी नगरसेवक कै.अनंत (बंटी) हरिशचंद्र जोशी यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ४. | श्री.भागचंद (अमर) मोतीलाल जैन | जळगांव शहर मनपा वार्ड क्रं.८ मधिल रहिवासी १) कै.दत्तात्रय बाजीराव बडगुजर, २) कै.नितीन रमेश कोष्टी, ३) कै.मिराबाई दामोदर झोपे, ४) कै.विजय भागवत पाटील, ५) कै.सुनंदा रमेश जोशी यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ५. | श्री.राजेंद्र झिपरु पाटील (घुगे पाटील) | १) कै.अलका हरिभाऊ ढाकणे, २) RPI चे पदाधिकारी कै.दिपकभा ऊ सपकाळे, ३) कै.समाधान शेनफडू घुगे, ४) कै.देविदास हिरालाल सोनवणे यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ६. | सौ.अनिता सुरेश भापसे | जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्रमांक १८ मध्ये सफाई कर्मचारी म्हणुन कार्यरत असलेले कै.शितल लक्ष्मण धनवाल यांचे दु:खद निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

सही/-

**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**नगरसचिव,महानगरपालिका,जळगांव.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सौ.दिपमाला मनोज काळे<br>मा.महापौर | १) चि.आकाश ओम त्रिवेदी यांनी युपीएससी परिक्षेत ऑल इंडिया रँक ७३ मिळवून उत्कृष्ठ कामगिरी केल्याबद्दल तसेच<br>२) कु.नंदिनी संजय पाटील केले यांनी युपीएससी परिक्षेत ऑल इंडिया रँक ५१२ मिळवून उत्कृष्ठ कामगिरी केल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| २. | श्री.राजेंद्र झिपरु पाटील (घुगे पाटील) | श्री.सुनिल जगन्नाथ गोराणे, सेवानिवृत्त नगरसचिव यांनी नगरसचिव या पदाचे काम करताना सर्व पक्षीय सन्माननीय पदाधिकारी व नगरसेवक यांच्याशी चांगला समन्वय ठेवून एका तासात स्थायी समिती तसेच महासभेचे ठराव तयार करुन वेबसाईटवर प्रसिध्द करणे हे उल्लेखनीय कामकाज त्यांनी केले आहे. जळगांव मनपाचे सभा कामकाज नियमास शासनाची मान्यता मिळणेसाठी प्रयत्न केले आहेत. तसेच कोरोना काळात शासनाचे निर्देशानूसार ऑनलाईन सभा आयोजित करणेचे काम तसेच आताचे मनपाच्या सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत पूर्ण वेळ काम केलेले आहे.<br>सन २०१९ पासून ते सेवामुक्तीच्या दिवसापर्यंत त्यांनी खुप चांगल्या प्रकारे कामकाज केलेले आहे म्हणून अशा प्रामाणिक व कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याचे हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने हे सभागृह अभिनंदन करीत असुन त्यांचे उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहोत.

सही/-
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**नगरसचिव,महानगरपालिका,जळगांव.**

दिनांक २०/०२/२०२६ रोजी प्रस्तुत जळगांव शहर महानगरपालिका नागरी क्षेत्रासाठी "वृक्षप्राधिकरण समिती" पुनर्गठन करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका नागरी क्षेत्रासाठी वृक्षप्राधीकरण समिती पुनर्गठण करणेकामी

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम३ (१) नुसार महानगरपालिकेची निवडणूक झालेली असून नवीन "वृक्षप्राधिकरण समिती गठीत करणे आवश्यक आहे.

सदर वृक्षप्राधिकरणात अध्यक्ष आणि इतर यासह कमीत कमी पाच आणि जास्तीत जास्त पंधरा सदस्यांचे निवड करुन 'वृक्षप्राधिकरण समिती' पुनर्गठण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६८** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- श्री.बालाणी प्रकाश रावलमल**

सही/-
**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

पा.पु.झोन क्र.११ मधील जुना खेडी रोड वरील बैठक हॉल पासुन वाढीव भाग खेडी शिवार गट नं.११,१२ व १३ करिता पाईप लाईन टाकणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, पा.पु.वि आ.क्र ६२२ दि ३०/०९/२०२५ व पा.पु.वि.आ.क्र.७२२ दि ११/११/२०२५ अन्वये खेडी बु‖ शिवारातील ग.नं. ११,१२,१३ व १४ महालक्ष्मी पार्क, मनुमाता नगर, जळगाव शहर यांच्या परिसरात केलेल्या पिण्याच्या पाईप लाईन मध्ये पाणी पुरवठा करून आम्हा नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळणेबाबत विषयास अनुसरून विनंती अर्ज प्राप्त झालेला आहे.

अर्जदार यांचा परिसर अमृत झोन MIDC-२ अंतर्गत समाविष्ट आहे. त्या परिसरात पाण्याची उंच टाकी बांधली गेलेली नसल्याने त्यांना आज पर्यंत पाणी पुरवठा करता आला नाही.

उपमहापौर आणि स्थानिक प्रभागातील नगरसेवक यांनी दि. २३/०२/२०२६ रोजी सदर भागात पाहणी करून नागरिकांना त्वरित पाणी कसे देता येईल त्यासाठी आवश्यक त्या उपाय योजना करण्याच्या सुचना केल्या आहे. सदर भागात पाणी पुरवठा करणेसाठी पा.पु. झोन.क्र. ११ मधील मुख्य जलवाहिनी जूना खेडी रोड बैठक हॉल पासून मनुमाता मंदिर रोड पर्यंत २०० मीमी पाईप लाईन टाकणे व परिसरात ११० मीमी HDPE मीमी पाईप लाईन टाकणे व ठिकठिकाणी व्हॉल बसवून पाईप लाईन जोडणेसाठी अंदाजपत्रक जिल्हादर सूची सन-२०२३-२४ चे दरनुसार तयार केले असून त्यास अंदाजित रक्कम रुपये ३३,२५,४२३/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर भागात पाईप लाइन टाकल्यास नागरिक नळसंयोजन घेवून मनपाचे उत्पन्न वाढणार असल्याने पा.पु.झोन क्र.११ मधील जुना खेडी रोड वरील बैठक हॉल पासुन वाढीव भाग खेडी शिवार गट नं.११,१२ व १३ करिता पाईप लाईन टाकणेचे कामास येणाऱ्या अंदाजित रक्कम रुपये ३३,२५,४२३/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता तांत्रिक मान्यता तदनंतर ई-निविदा प्रसिद्ध करणेस तसेच सदरचा खर्च पाणी पुरवठा व्यवस्था दुरुस्ती अंतर्गत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६८ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- कु.सोनवणे प्रतिक्षा कैलास**

**अनुमोदक :- श्री.तायडे निलेश विश्वनाथ**

सही/-

**(दिपमाला मनोज काळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

महानगरपालिका हद्दीत स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत शहर स्वच्छता कृती आराखडा अनुसरुन सामुदायिक/सार्वजनिक/आकांक्षी शौचालये (CT/PT/APT) बांधकामाकरिता तसेच सुस्थितीत नसलेले शौचालये निष्कासित करुन त्या जागेवर नविन शौचालय बांधकाम करणे कामी तयार करण्यात आलेल्या प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत शहर स्वच्छता कृती आराखडयास अनुसरुन सामुदायिक / सार्वजनिक शौचालये/ आकांक्षी सार्वजनिक शौचालय (CT/PT / APT) बांधकामासाठी निधी / अनुदान अनुज्ञेय आहे. स्वच्छ शौचालय अभियाना अंतर्गत केंद्र शासनाने सन-२०१४ पुर्वी बांधकाम झालेले व सुस्थितीत नसलेले शौचालये निष्कासित करुन त्या जागेवर नविन शौचालय बांधकाम करण्यासाठी तसेच यापुर्वी बांधकाम केलेल्या शौचालयाची आवश्यक असल्यास दुरुस्ती करण्यासाठी निधी अनुज्ञेय केलेला आहे.

जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील सध्यस्थितीत ४४ ठिकाणी सार्व. शौचालय तट (पुरुष-५५५ सिट्स व स्त्री-६२६ असे एकूण ११८१ सिट्स) असून महासभा प्रशासकिय ठराव क्रं. १७० दि.२०/०९/२०२४ नुसार सार्वजनिक शौचालय / आकांक्षी शौचालय बांधणे इ. कामांचे सर्वेक्षण करुन सविस्तर अंदाजपत्रक व DPR तयार करणे कामी अनुभवी PMC (प्रकल्प तांत्रिक सल्लागार) यांची नियुक्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

ऑल इंडिया इंस्टिट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, नाशिक PMC (प्रकल्प तांत्रिक सल्लागार) यांची महासभा प्रशासकिय ठराव क्र. २५७ दि.१२/०३/२०२५ व कार्यादेश क्र. ११६३/२०२४-२५ दि.१७/०३/२०२५ नुसार करारनामा करुन कार्यादेश देण्यात आलेला असून जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत शहर स्वच्छता कृती आराखडा अनुसरुन सामुदायिक / सार्वजनिक / आकांक्षी शौचालयाचे बांधकामासाठी एकूण पुरुष-२१५ व महिला-२१५ असे एकूण ४३० सिट्सचे ४३ शौचालयांचे सविस्तर रक्कम रु.१०,७४,९२,७५९/- खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर अंदाजपत्रकास शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांनी दि.१०/०३/२०२५ रोजी तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिका हद्दीतील स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत शहर स्वच्छता कृती आराखडा अनुसरुन सामुदायिक / सार्वजनिक / आकांक्षी शौचालये (CT/PT/APT) बांधकामाकरिता तसेच व सुस्थितीत नसलेले शौचालये निष्कासित करुन त्या जागेवर नविन शौचालय बांधकाम करणे कामी प्रस्ताव मा.राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचेकडे प्रस्ताव पाठविणेपुर्वी मा.महासभेची मंजूर घेणे आवश्यक आहे.

करिता सामुदायिक / सार्वजनिक / आकांक्षी शौचालये नविन बांधकाम दुरुस्ती करिता केंद शासनाच्या (३३%) व राज्य (३७%) हिस्सा प्रमाणे महानगरपालिकेचा (३०%) हिस्सा खर्च करणे अभिप्रेत आहे. तसेच सामुदायिक / सार्वजनिक / आकांक्षी शौचालये (CT/PT / APT) बांधकामाकरिता व दुरुस्ती करिता लागणारा म.न.पा. हिस्सा हा शासना मार्फत प्राप्त होणाऱ्या निधी / इतर अनुज्ञेय निधी / म.न.पा. निधी मधून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६८ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.लड्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- श्री.भंगाळे विष्णु रामदास**

सही/-

**(दिपमाला मनोज काळे)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**

**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**